ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख १४ एप्रिल, १९५४ | अंक १५

## विविध माहिती

**भूदानासंबंधीं चित्रपट**—समाज शिक्षणासंबंधीं उत्तर प्रदेश सरकारनें एक चित्रपट तयार केला आहे. ह्या चित्रपटांत विनोबाजींची मुख्य भूमिका आहे. ह्या चित्रपटाखेरीज उत्तर प्रदेशांतील जत्रा, आग्रा येथील किल्ला, फत्तेपूर शिक्री, सारनाथ, इत्यादि प्रसिद्ध ऐतिहासिक स्थळासंबंधींहि चित्रपट तयार करण्यांत आले आहेत.

**बद्रिनाथाच्या देवळावर प्रकाशझोत**—उत्तर प्रदेशांतील सुप्रसिद्ध यात्रेचें ठिकाण बद्रिनाथचें देऊळ, त्यावर विजेचा प्रकाशझोत टाकण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे. ह्या कामासाठीं एक छोटेसें विद्युत्पादन-केंद्र उभारण्याचा परवाना देवळाच्या व्यवस्थापकांना देण्यांत येईल. हें देऊळ भारत आणि चीन ह्यांच्या सरहद्दीवर असून समुद्रसपाटीपासून १४,००० फूट उंचीवर आहे.

**मॉस्कोमधील वहातूक**—मॉस्कोमधील भूमिगत रेल्वेच्या वहातुकींत सुधारणा करण्यांत येत आहेत. १० भूमिगत रेल्वे गाड्यांतून रेडिओची व्यवस्था करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें ट्रॅमगाड्यांतूनहि रेडिओ लावण्यांत आले आहेत. गाड्यांचा ड्रायव्हर आंतील लोकांना जरूर ती माहिती आणि सूचना रेडिओच्या साह्यानें देत असतो.

**लखनौच्या प्राणिसंग्रहालयासाठीं अजगर**—लखनौ येथील प्राणि संग्रहालयासाठीं जंगलखात्यानें ३ अजगरें दिलीं आहेत. त्यापैकीं एक अजगर २० फूट लांबीचा आहे. संग्रहालयांत पक्ष्यांचा एक नवा विभाग उघडण्यांत आला आहे. ह्या विभागांत नैनितालच्या जंगलांत सांपडणारे कांहीं नव्या प्रकारचे पक्षी ठेवण्यांत आले आहेत.

**कच्छमधील विकास योजना**—कच्छमधील समाज-विकास योजनांतर्गत पाटबंधाऱ्याच्या कामासाठीं भारतीय सरकारनें १,७५,००० रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. ह्याशिवाय सामुदायिक शेती करणाऱ्यांना कर्जें देण्यांत येतील आणि सहकारी सोसायट्यांनाहि आर्थिक मदत देण्यांत येईल.

**नागरी विमान वहातूक**—भारताचे नागरी विमान वहातुक खातें ७७ विमानतळांचा उपयोग करतें. १९३० सालीं अवघे चारच विमानतळ वापरण्यांत येत होते. युद्धानंतरच्या कालांत त्यांची संख्या ४५ पर्यंत वाढली होती.

**हातमागाच्या कापडाची निर्यात**—१९५३ सालीं भारतानें ६·३९६ कोटी वार हातमागाचें कापड परदेशीं निर्यात केलें. १९५२ सालीं ५·५०४ वार हातमागाचें कापड निर्यात करण्यांत आलें होतें.

**अणुशक्तीच्या उपयोगाची दुसरी बाजू**— अमेरिकन केमिकल सोसायटीचे अध्यक्ष डॉ. हॅरी फिशर ह्यांनीं अणुशक्तीच्या शांततामय उपयोगाकडे अधिक लक्ष देण्याची विनंति लोकांना केली आहे. अणुशक्तीवर चालणाऱ्या मोटारी, विमानें, आगगाड्या व बोटी ह्याच पिढींतील लोकांना पहावयास सांपडतील असें त्यांचें म्हणणें आहे. त्याशिवाय अन्नांतील अनिष्ट जंतु मारणें, रोगाला दाद न देणारीं पिकें तयार करणें इत्यादि बाबतींतहि अणुशक्तीचा उपयोग त्यांनीं वर्तविला आहे.

**तामीळ भाषेंतील ज्ञानकोष**—तामीळ भाषेंत ७,५०० पृष्ठें असलेला ज्ञानकोष प्रसिद्ध करण्यांत येत आहे. सर्व ज्ञानकोष १० खंडांत प्रसिद्ध होणार असून त्यांपैकीं पहिला खंड एप्रिलच्या १३ तारखेला प्रसिद्ध झाला. हें कार्य तामीळ ॲकॅडमीतर्फे करण्यांत येत आहे. सर्व कामाला १० लाख रुपये खर्च येईल.

**चंगीझखानाची दफनपेटी**—इ. स. ११६२ ते १२२७ ह्या कालांत चंगीझखान हा प्रसिद्ध जगज्जेता होऊन गेला. त्याचें शव असलेली दफनाची पेटी अंतर्मंगोलिआच्या राजधानींत नुकतीच नेण्यांत आली. तेथून ती पीतनदीच्या पश्चिम कांठावर असलेल्या थडग्यांत पुरण्यांत येणार आहे. ह्या थडग्याची डागडुजी करण्यांत आली आहे.

**केवढी ही घरांची टंचाई**—इंटर नॅशनल लेबर ऑफिसनें प्रसिद्ध केलेल्या अहवालाप्रमाणें जगांतील एक तृतिआंश लोकसंख्येला म्हणजे सुमारें १८ कोटी कुटुंबांना रहाण्याला योग्य अशीं घरें नाहींत. ह्या कुटुंबांपैकीं ३ कोटी कुटुंबें उद्योगदृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्रांतील आहेत. कित्येक कुटुंबांना तर साधा आसरा सुद्धां नाहीं.

**चंदनाच्या झाडाची लागवड**—उत्तर प्रदेश सरकारचें जंगल-खातें 'मलयगिरी' ह्या उत्कृष्ट प्रकारच्या चंदनाच्या झाडाची लागवड बुंदेलखंडांत करण्याची योजना आंखीत आहे. दरवर्षी सुमारें १०० एकर जमिनींत ह्या झाडाची लागवड करण्यांत येईल असें समजतें. राज्यांतील वृक्षसंपत्तींत विविध प्रकारच्या झाडांची भर घालण्याचा त्या सरकारचा विचार आहे.

**ब्रिटनचा नवा अणु-कारखाना**—लंडनपासून ४० मैलांवर असलेल्या एका बेटावर ब्रिटिश सरकारनें अणुशस्त्रांचें संशोधन करणारा नवा कारखाना बसविला आहे. अणुबाँबमध्यें स्फोट घडवून आणणें आणि अणु तोफ-गोळ्यांच्या स्फोटाची यंत्रें बनविणें हें काम मुख्यतः नव्या कारखान्यांत करण्यांत येणार आहे.

## दोन्ही बँकांचा दोष नाहीं; मग भुर्दंड कोणावर ?

### सुप्रीम कोर्टाचा निवाडा

टाटा आयर्न अँड स्टील कंपनी लि. व स्टील कॉर्पोरेशन ऑफ बंगॉल लि. ह्या दोन कंपन्यांचे मिळून ८०० भाग राधिका मोहन भुइया ह्यांच्या मालकीचे होते. फेब्रुवारी, १९४६ मध्यें श्री. भुइया ह्यांनीं ते भाग श्री. द्विजेंद्रनाथ मुकर्जी ह्यांना ३८,५६२ रु. ८ आ. किंमतीस विकण्याचें मान्य केलें. १४ फेब्रुवारी रोजीं श्री. भुइया ह्यांनीं सेंट्रल नॅशनल बँक लि.कडे हे भाग ट्रान्सफरच्या कागदासह पाठविले व खरेदीदाराकडून पूर्ण किंमत घेऊनच शेअर सर्टिफिकिटें व ट्रान्स्फर कागद त्यांच्या हातीं द्यावीं, अशी बँकेला स्पष्ट सूचना दिली. १८ फेब्रुवारी रोजीं बँकेनें तिचा एक अधिकारी श्री. नीलकंठ पॉल ह्यांस मुकर्जींना त्यांच्या कचेरींत भेटण्यास व त्यांचेकडून पंजाब नॅशनल बँकेची ३८,५६२ रु. ८ आ. ची पेऑर्डर घेऊन त्यांना शेअर सर्टिफिकिटें व इतर कागद देण्यास सांगितलें. त्याप्रमाणें पॉल मुकर्जींच्या कचेरींत गेले. मुकर्जींनीं पॉलकडे शेअर सर्टिफिकिटें मागितलीं, पण पेऑर्डर हातीं आल्याखेरीज सर्टिफिकिटें देण्याचें त्यांनीं नाकारलें. "सर्टिफिकिटें व ट्रान्स्फरचे कागद बरोबर आहेतना, एवढेंच मला पहावयाचें आहे" असें मुकर्जींनीं पॉलला सांगितलें, तेव्हां पॉलनें ते कागद टेबलावर ठेवले. मुकर्जीनें शेअर सर्टिफिकिटें काळजीपूर्वक तपासलीं आणि तो उठून उभा राहिला व सर्टिफिकिटें व कागद काखेंत मारून खोलींतून बाहेर जाऊं लागला, तेव्हां पॉलनें "पे ऑर्डर न देतां जाऊं नका" असें बजावलें. त्यावर मुकर्जीनें सांगितलें, "पे ऑर्डर तयार आहे; तीच मी घेऊन येतों. जरा बसाना; हा मी आलोंच" मुकर्जी तेथून जो सटकला, तो पॉलला कधींच पुनः दिसला नाहीं. मुकर्जी तेथून सरळ दुसऱ्या एका बँकेंत (युनायटेड इंडस्ट्रिअल बँक लि.) गेला व तेथें हे शेअर्स गहाण टाकून त्यावर २९,००० रु. चें कर्ज मिळवून पसार झाला! ही व्यवस्था त्यानें अगोदरच करून ठेवली होती. युनायटेड इंडस्ट्रिअल बँकेंत त्यानें १०० रु. चा चेक भरून नवीन खातें उघडलें होतें. (हा चेकहि पुढें खोटा ठरून परत आला) व या चालू खात्यावर त्यानें २९,००० रु. चा ओव्हरड्रॉफ्ट घेतला. ह्या रकमेची एक प्रॉमिसरी नोटहि त्यानें बँकेस दिली. २९,००० रु. बँकेंतून घेऊन गेला, तेव्हांपासून त्याचा अद्याप कोणासहि पत्ता लागलेला नाहीं. इकडे, पॉल कंटाळून आपल्या बँकेंत परत गेला व त्यानें घडलेली हकिगत वरिष्ठास सांगितली. बँकेनें पोलिसाकडे तक्रार नोंदविली, परंतु तिचा कांहींच उपयोग झाला नाहीं.

सेंट्रल नॅशनल बँक आणि युनायटेड इंडस्ट्रिअल बँक ह्या दोन बँकांपैकीं युनायटेड बँकेजवळ शेअर्स व ट्रान्स्फर कागद होते व ओव्हरड्राफ्टच्या कराराप्रमाणें ते शेअर्स विकून कर्ज वसूल करण्याचा तिला अधिकार होता. उलट, सेंट्रल बँकेच्या अधिकाऱ्यानें श्री. भुइया ह्यांच्या सूचनेच्या विरुद्ध, हातीं ३८,५६२ रु. ८ आ. न येतां, शेअर्स देऊन टाकले होते. सेंट्रल बँकेनें श्री. भुइया ह्यांचे पैसे देण्याची टाळाटाळ केली नाहीं; शेअर्सची पूर्ण रक्कम तिनें त्यांना दिली. आतां प्रश्न आला, कीं ह्या दोन बँकांचे शेअर्समधील हक्क कोणत्या प्रकारचे होते?

दोन्ही बँकांनीं तत्परतेनें उपाययोजना केली. युनायटेड बँकेनें मुकर्जीला नोटीस देऊन कर्ज तावडतोब परत फेडण्याची मागणी केली; नाहींतर शेअर्स विकून टाकले जातील अशी धमकी दिली. अर्थात्, नोटिशीला कांहींच उत्तर आलें नाहीं व बँकेनें श्री. जालन ह्या ब्रोकरमार्फत शेअर्स विकून टाकले. त्यांनीं शेअर्सची डिलिव्हरी घेऊन १६,००० रु. चा चेक शेअर्सच्या किंमतीच्या पोटीं दिला. परंतु, पोलिसांनीं ह्या प्रकरणांत हात घातला असल्यानें, चेकची "पेमेंट स्टॉप" झाली व शेअर्सहि पोलिसांनीं आपल्या ताब्यांत घेतले. इकडे, सेंट्रल नॅशनल बँकेनें शेअर्सची किंमत श्री. भुइयांना देऊन टाकलेलीच होती. तिनें मॅजिस्ट्रेटकडे अर्ज केला, कीं शेअर्सची मालकी तिची आहे; तेव्हां ते शेअर्स तिला मिळावेत. ह्या अर्जास युनायटेड बँकेनें सहाजिकच विरोध केला, आणि तिनें "आपणाकडे शेअर्स गहाण असल्यानें ते बाळगण्याचा अधिकार आपणांस आहे" ह्या मुद्यावर दिवाणी दावा लावला. श्री. भुइयांना पैसे चुकते झाले असल्यानें, त्यांना ह्या वादांत पडण्याचें कारणच नव्हतें; दोन बँकांत कायदेशीर युद्ध सुरू राहिलें.

मुकर्जीला शेअर्सच्या बाबतींत कांहींच हक्क नव्हता. पुढें मागें तो म्हणूं शकेल, कीं त्याचेविरुद्ध असलेला आरोप खोटा असून त्यानें शेअर्सच्या किंमतीची भरपाई केलेली होती. परंतु दोन बँकांतील दिवाणी दाव्याचा अखेरचा निकाल होईपर्यंत मुकर्जी उगवलाच नसल्याकारणानें त्यानें शेअर्सचा ताबा लबाडीनें घेतला असेंच सर्व कोर्टांनीं स्वाभाविकच गृहीत धरलें होतें. त्यामुळें खऱ्या मालकाकडून शेअर्स गहाण घेतले होते हा मुद्दा युनायटेड बँकेला उपयोगी पडणारा नव्हता. इंडिअन सेल ऑफ गुड्स कायद्याचें ३० (२) हें कलम त्या बँकेनें आधार म्हणून घेतलें. "विकत घेणारानें, विकणाराकडून, इतरांच्या पूर्वहक्कांची माहिती नसतांना, शुद्ध हेतूनें कांहीं विकत घेतलें तर असा पूर्व अधिकार नव्हताच, असें गृहीत धरलें जाईल, इत्यादि." मुकर्जीनें भुइयाकडून शेअर्स विकत घेण्याचें ठरविलें होतें, त्याप्रमाणें ते शेअर्स मुकर्जीच्या हातीं विकणाराच्या संमतीनेंच आलें, शेअर्सच्या मालकी हक्काबाबत कांहीं तंटा आहे असें बँकेला मानण्याचें कारणच नव्हतें, मुकर्जीकडून शुद्ध हेतूनें शेअर्स गहाण म्हणून घेतले, असा युनायटेड बँकेचा युक्तिवाद होता. कलकत्ता हायकोर्टाचे न्यायमूर्ति सरकार ह्यांनीं हें म्हणणें मान्य केलें, आणि युनायटेड बँकेच्या तर्फे निवाडा केला. त्यावर बँकनें अपील केलें आणि अपिलांत न्यायमूर्ति ट्रेव्हर हॅरिस व न्यायमूर्ति बानर्जी ह्यांनीं न्यायमूर्ति सरकारांचा निवाडा फिरवला "मुकर्जी शेअर्स घेऊन पळाला, ही गोष्ट त्यानें पॉलच्या खिशांतून ते घेऊन चोरी केली, ह्या स्वरूपाचीच समजली पाहिजे" असें न्यायमूर्ति द्वयांचें मत पडलें. वरील ३० (२) ह्या कलमांतील "विकणाराच्या संमतीनें" (वुइथ दि कन्सेंट ऑफ दि सेलर) हे शब्द महत्त्वाचे आहेत. "सेंट्रल नॅशनल बँकेच्या अधिकाऱ्याच्या संमतीनें मुकर्जीनें शेअर्स घेतले काय?" ह्या प्रश्नाच्या उत्तरावरच प्रस्तुत प्रकरणांतील सर्व निवाडे आधारलेले होते; सुप्रीम कोर्टानें अपील नामंजूर केलें, "पॉलनें टेबलावर शेअर सर्टिफिकिटें ठेवलीं आणि तीं तपासण्यास मुकर्जीला परवानगी दिली, ह्याचा अर्थ पॉलनें सर्टिफिकिटांवरील ताबा सोडला असा होत नाहीं. केवळ तपासण्यासाठींच मुकर्जीच्या हातीं तीं कांहीं काळ होतीं. मुकर्जी तीं घेऊन खोलीबाहेर गेला, तेव्हां त्याचा शेअर सर्टिफिकेटांवर ताबा आला हें निश्चित; परंतु पुराव्यावरून तो ताबा पॉलच्या संमतीनें मिळविला, असें आम्हांस वाटत नाहीं. पॉलनें तक्रार केली, तरी त्याला थांबावयास सांगून मुकर्जी पळून गेला." असें म्हणून "विकणाराच्या संमतीनें" मुकर्जीच्या हातीं सर्टिफिकिटें आलीं नाहींत असें सुप्रीम कोर्टानें ठरविलें.

# अर्थ

बुधवार, ता. १४ एप्रिल, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## विमा व्यवसायांत खळबळ

न्यू इंडिया आणि ओरिएंटल ह्यांच्या मागोमाग आतां वेस्टर्न इंडियानेंहि विम्याच्या हप्त्यांत उतार जाहीर केला आहे. एन्डौमेंट विम्याचे दर सुमारें ७% व हयातीनंतरच्या विम्याचे दर २५ ते २७% उतरले आहेत, असें समजतें. १९५२ मध्यें १९५१ च्या मानानें भारतांत विम्याचें नवें काम कमी प्रमाणांत झालें होतें. हें नवें काम सुमारें १,००० विमापत्रें, २·१० कोटी रु. विमा रक्कम आणि ०·२२ कोटी रु. वार्षिक हप्त्यांचें उत्पन्न इतक्यांनीं कमी होतें. तथापि, ही घट तात्कालिक ठरेल व ह्यापुढें विम्याच्या कामांत सुधारणा होत जाईल अशी अपेक्षा आहे. विकास योजनांवरील खर्च वाढत आहे; एस्टेट ड्यूटी कायद्यामुळें विमा उतरण्यास प्रोत्साहन मिळणार आहे. वारसा कर भरण्यासाठीं त्या कराच्या रकमेइतक्या परंतु ज्यास्तींत ज्यास्त ५०,००० रुपयांच्या उतरविलेल्या व सरकारला बेचन करून दिलेल्या विमापत्रांची रक्कम मालमत्ता करमाफीस पात्र आहे. त्याचप्रमाणें, मयत माणसाच्या विम्याची ५,००० रुपयांपर्यंतची रक्कम व मयत माणसावर सर्वस्वी अवलंबून असणाऱ्या स्त्री-नातेवाईकांसाठीं, विवाहासाठीं म्हणून विमारूपानें विश्वस्त निधि करून अगर ठराव पत्रानें केलेली ५,००० रुपयांपर्यंतची रक्कमहि करमाफ आहे. विम्याचे हप्ते उतरले, म्हणजे विम्यास अधिक चालना मिळण्यास आणखी एक कारण निर्माण होणार आहे.

मृत्यूंच्या प्रमाणाबाबत भारतांतील परिस्थिति सुधारत आहे. (१) ओरिएंटल अल्टिमेट (१९२५-३५) आणि (२) १९४१-१९५० चे अखिल भारतीय तक्ते ह्यांच्यांत अनुक्रमें (१) फक्त विमेदार आणि (२) सर्वच लोक समाविष्ट असतात. तथापि, दोन्हींतहि सुधारणा झालेली आहे. मृत्यूंच्या सर्वसाधारण अनुभवाची दिशा खालील आकडे दर्शवितील.

| | |
|---|---|
| १८८१-१८९० | २४·६ |
| १८९१-१९०० | २३·६ |
| १९०१-१९१० | २२.६ |
| १९११-१९२० | १८·९ |
| १९२१-१९३० | २६·९ |
| १९३१-१९४० | ३२·१ |
| १९४१-१९५० | ३२·५ |

१९४६-५२ ह्या काळांतील मृत्यूंची जी अपेक्षा ओरिएंटलच्या तक्त्यावरून केली होती, त्या अपेक्षेचे मानानें फक्त ६०% मृत्यू घडून आले, असें न्यू इंडिया विमा कंपनीनें प्रसिद्ध केलें आहे. साहजिकच त्याचा परिणाम उत्पन्नांत वाढ व वाढाव्यांत भर असा होणें स्वाभाविक आहे. हप्ते कमी करण्याचें हें महत्त्वाचें कारण आहे. इनकमटॅक्स कायद्यांतील दुरुस्तीमुळें विमा कंपन्यांना मिळालेली सवलत (विमेदारांना दिलेला ५०% वाढावा पूर्वी करमाफ होता, आतां ८०% करमाफ आहे.) गुंतवणुकीवर मिळणाऱ्या व्याजाच्या दरांतील वाढ (१९४७ च्या मानानें आतां १०१% व्याज जास्त मिळतें.) १९५२ मधील रोख्यांच्या किंमत-उताराचा अपेक्षेपेक्षा कमी झालेला दुष्परिणाम, व्यवस्था खर्चाचा उत्पन्नाशीं बसत चाललेला मेळ, ह्या सर्वांमुळें मोठ्या कंपन्यांना फारच अनुकूल असा वाढावा अनुभवास येऊं लागला आहे आणि बोनस देण्यास आवश्यक त्यापेक्षाहि हा वाढावा मोठा येत राहणार ह्या अपेक्षेनें मूळ हप्त्यांचे दरच उतरविण्यांत येत आहेत. जुन्या, गेल्या कांहीं वर्षांत विमा घेतलेल्या विमेदारांना पूर्वीच्याच दरानें हप्ते देत रहावे लागेल, हें उघड आहे. नफाविरहित विम्यावर जरूरीपेक्षा जास्त दरानें हप्ते घेणें अन्यायाचें आहे, कारण नफ्यांत त्यांना भागीदारी नसते. म्हणून, त्यांना नव्या अनुकूल परिस्थितीचा फायदा मिळणें रास्तच आहे. नफ्यासह विम्याचे हप्ते उतरविले, तर नव्या विमेदारांना कमी रकमेंत ज्यास्त मोठें विमासंरक्षण मिळूं शकेल व बचतीस प्रोत्साहन मिळेल. ह्याउलट, हप्ते कमी करण्याऐवजीं मोठा बोनस देण्याचें ठरविलें तर त्या बोनसचा फायदा पदरांत पडण्यासाठीं नव्या विमेदाराला दीर्घकाल थांबावें लागेल. विमा नव्या विमेदारांना अधिक आकर्षक करावयास तो स्वस्त करणें हाच प्रभावी उपाय आहे. ह्या जाणीवेनेंच हप्ते उतरविण्याचा महत्त्वाचा निर्णय कांहीं कंपन्यांनीं घेतला आहे. त्यामुळें लहान कंपन्यांवर काय परिणाम होतो, हें पाहावें लागेल. इंडियन लाइफ ॲशुअरन्स ऑफिसेस असोसिएशनच्या अध्यक्षस्थानावरून श्री. एस. व्ही. श्रीनिवासन् ह्यांनीं हप्ते कमी करणाऱ्या कंपन्यांना तो निर्णय बदलण्याची विनंति केली आहे. कांहीं मोठ्या कंपन्यांना हप्ते उतरविणें परवडेल, परंतु त्यांनीं मध्यम व लहान आकाराच्या कंपन्यांचा विचार केलेला नाहीं, अशी श्री. श्रीनिवासन् ह्यांची तक्रार आहे. लहान कंपन्यांनाहि हप्ते उतरविणें भाग पडलें, तर त्यांजवर आपत्ति ओढवेल, असा त्यांनीं इशारा दिला. फार मोठ्या कंपन्यांना विदेशी कंपन्यांशीं स्पर्धा करावी लागते आणि विदेशी कंपन्यांचे दर तर कमी असतात, जनतेलाहि स्वस्त विमा हवाच आहे; पण भारतीय विमा क्षेत्रांत धरणीकंप घडून येता कामा नये, हें उघड आहे. मोठ्या विमा कंपन्यांनीं हिंदी विमा कंपन्यांच्या हिताकडे दुर्लक्ष केलें, तर विम्याचे किमान दर ठरवून देण्याची विनंति लाइफ इन्शुअरन्स कौन्सिलच्या एक्झिक्यूटिव्ह कमिटीला सरकारकडे करावी लागेल, असें श्री. श्रीनिवासन् ह्यांनीं बजावलें. किमान दर सरकारनें ठरवून दिले, तर त्यापेक्षां स्वस्त दरानें कोणतीच कंपनी विमे देऊंच शकणार नाहीं. मोठ्या कंपन्यांच्या हप्त्यांतील उतारानें विमा क्षेत्रांत खळबळ उडवून दिली आहे, हें मात्र खरें.

### "अर्था"चा सहकार विशेषांक

"अर्था"चा येता अंक सहकारी सुवर्ण महोत्सवानिमित्त "सहकार विशेषांक" म्हणून प्रसिद्ध होईल.

# दि भारत इंडस्ट्रियल बँक, लिमिटेड, पुणें.

## दि. ३१ डिसेंबर १९५३ अखेरचा ताळेबंद.

| मांडवल व देणें | | रु. आ. पै | रु. आ. पै |
|---|---|---|---|
| **१ मांडवल** | | | |
| **अधिकृत मांडवल** | | | |
| १,०८९, ६ टक्के क्युमिलेटिव्ह ( ५ वर्षांनंतर परत फेडीचें ) प्रेफरन्स शेअर्स प्रत्येकीं रु. ४० प्रमाणें | | ४३,५६०—०—० | |
| ३०,००५, ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकीं रु. ५० प्रमाणें | | १५,००,२५०—०—० | १५,४३,८१०—०—० |
| **विक्रीस काढलेलें व खपलेलें मांडवल** | | | |
| १,०८९, ६ टक्के क्युमिलेटिव्ह ( ५ वर्षांनंतर परत फेडीचें ) प्रेफरन्स शेअर्स प्रत्येकीं रु. ४० प्रमाणें | | ४३,५६०—०—० | |
| ५,००५, ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकीं रु. ५० प्रमाणें | | ७,५०,२५०—०—० | ७,९३,८१०—०—० |
| **मागणी केलेलं व वसूल झालेलं मांडवल** | | | |
| १,०८९, ६ टक्के क्युमिलेटिव्ह ( ५ वर्षांनंतर परत फेडीचे ) प्रेफरन्स शेअर्स प्रत्येकीं रु. २५ प्रमाणें | | २७,२२५—०—० | |
| १५,००५, ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकीं रु. २५ प्रमाणें ( या पैकीं ५ शेअर्स पूर्ण भरपाई झालेले ) | | ३,७५,२५०—०—० | |
| | | ४,०२,४७५—०—० | |
| वजा मागणी केलेले परंतु वसूल न झालेलें | | २,२९०—०—० | |
| | | ४,००,१८५—०—० | |
| अधिक रद्द झालेले शेअर्स | | नाहीं | ४,००,१८५—०—० |
| मागापोटीं आगाऊ भरलेले | | | २९०—०—० |
| **२ रिझर्व फंड व इतर रिझर्व्हज्** | | | ८४,०००—०—० |
| **३ ठेवी व इतर खातीं** | | | |
| मुदतीच्या ठेवी व रिकरिंग डिपॉझिटस् | | २०,९५,२०८—१२—९ | |
| सेव्हिंग्ज बँक खातीं | | २०,४९,७१२—६—४ | |
| चालू व कॉन्टिजन्सी खातीं वगैरे. | | १३,५६,५५८—१३—१ | ५५,०१,४८०—०—२ |
| **४ इतर बँकांकडून अगर एजन्टस् यांजकडून घेतलेलीं कर्जें** | | | |
| ( १ ) भारतांत | | नाहीं | |
| ( २ ) भारताबाहेर | | नाहीं | नाहीं |
| **तपशील** | | | |
| ( १ ) सुरक्षित ( सरकारी कर्जरोख्याचे तारणावर ) | | नाहीं | |
| ( २ ) असुरक्षित | | नाहीं | |
| **५ बिल्स पेएबल** | | | ४२,१२०—५—३ |
| **६ वसुलीसाठीं आलेलीं बिलें** ( येणेंकडे दाखविल्याप्रमाणें ) | | | |
| ( १ ) भारतांत वसूल होणारी | | १,५४,००९—९—० | |
| ( २ ) भारताबाहेर वसूल होणारीं | | नाहीं | १,५४,००९—९—० |
| **७ इतर देणें** | | | ४५,८१६—१३—१० |
| **८ ॲक्सेप्टन्सेस एन्डॉर्समेन्ट व इतर ऑब्लिगेशन्स** ( येणेंकडे दाखविल्याप्रमाणें ) | | | नाहीं |
| **९ नफा तोटा खातें** | | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणें | | २१,०३५—१०—४ | |
| ( वजा वांटणी केलेला ) | | | |
| रिझर्व्ह फंड | ६,०००—०—० | | |
| इन्कमटॅक्स प्रोव्हिजन | १०,९०२—२—४ | | |
| ६ % प्रेफरन्स शेअर्सवरील डिव्हिडंड | १,६३३—८—० | | |
| इन्व्हेस्टमेंट घसारा फंड | १,५००—०—० | | |
| कॉन्टिन्जन्सी फंड | १,०००—०—० | २१,०३५—१०—४ | |
| रक्कम ( पुढें ओढलेली ) | | — | |
| अधिक १९५३ सालचा नफा ( ज्यावर प्राप्तीकर यावयाचा आहे ) | | २३,४८३—६—१ | २३,४८३—६—१ |
| **१० कॉन्टिन्जन्ट लायबिलिटीज** | | | |
| बँकेविरुद्ध कोर्टांत चालू असलेल्या दाव्यापोटीं रु. २,०००—०—० | | | |
| एकूण | | | ६२,५१,३८५—२—४ |

# दि भारत इंडस्ट्रियल बँक, लिमिटेड, पुणें.

## दि. ३१ डिसेंबर १९५३ अखेरचा ताळेबंद.

| जिंदगी व येणें | | रु. आ. पै | रु. आ. पै |
|---|---|---|---|
| **१ कॅश** | | | |
| रोख व रिझर्व्ह आणि इंपिरिअल बँकेकडे असलेली शिल्लक (परराष्ट्रीय चलनी नोटांसह) | | | ४,९८,००१—१०—११ |
| **२ इतर बँकांकडील शिल्लक** ( चालू खात्यांत ) | | | |
| ( १ ) भारतांत | | २,७०,८२४–१३–२ | |
| ( २ ) भारताबाहेर | | नाहीं | २,७०,८२४—१३—२ |
| **३ मनी ॲट कॉल ॲन्ड शॉर्ट नोटीस** | | | नाहीं |
| **४ इन्व्हेस्टमेंटस** – खरेदी किंमत | | | |
| ( १ ) प्रांतिक व मध्यवर्ती सरकारचे रोखे व ट्रस्टी सिक्युरिटीज, प्रांतिक व मध्यवर्ती सरकारचे ट्रेझरी बिल्स धरून ( दर्शनी किंमत रु. २१,९२,३०० चे बाजार भाव रु. १९,६९,५३६–१०–० ) | | २२,०७,८७४—४—० | |
| ( २ ) शेअर्स–को-ऑपरेटिव्ह बँकेचा पूर्ण भरपाई झालेला शेअर ( खरेदी किंमत ) | | ६०—०—० | |
| | | नाहीं | |
| ( ३ ) डिबेंचर्स अगर बाँडस् | | नाहीं | |
| ( ४ ) इतर इन्व्हेस्टमेंटस् | | नाहीं | २२,०७,९३४—४—० |
| ( ५ ) सोनें | | | |
| **५ ॲडव्हान्सेस** | | | |
| ( ऑडिटरच्या संमतीनुसार योग्य तरतूद केलेली संशयीत व बुडित कर्जे सोडून ) | | | |
| ( i ) कर्जे, कॅश क्रेडिट व ओव्हर ड्राफ्टस् | | | |
| ( १ ) भारतांत | २२,९८,७८७–२–० | | |
| ( २ ) भारताबाहेर | नाहीं | २२,९८,७८७—२—० | |
| ( ii ) बिल्स डिस्कौंटेड व परचेस्ड ( मध्यवर्ती व प्रांतिक सरकारची ट्रेझरी बिल्स खेरीज करून ) | | | |
| ( १ ) भारतांत वसूल होणारी | ३,१३,१७७–४–० | | |
| ( २ ) भारताबाहेर वसूल होणारी | नाहीं | ३,१३,१७७—४—० | २६,११,९६४—६—० |
| ॲडव्हान्सेसचा तपशील (पृष्ठ १२२ पहा) | | | |
| **६ वसुलीसाठीं पाठविलेलीं बिलें** ( देणेंकडे दाखविलेप्रमाणें ) | | | |
| ( १ ) भारतांत वसूल होणारीं | | १,५४,००९—९—० | |
| ( २ ) भारताबाहेर वसूल होणारीं | | नाहीं | १,५४,००९—९—० |
| **७ खातेदारांचे ॲक्सेप्टन्सेस एन्डॉर्समेंटस् व इतर लायबिलिटीज** ( देणेंकडे दाखविलेप्रमाणें ) | | | नाहीं |
| **८ इमारत व इमारतीची जागा** ( खरेदी किंमत ) मागील ताळेबंदाप्रमाणें | | १,२२,३०२—६—० | |
| अधिक चालू वर्षातील वाढ | | २,०८,३१६–१२—० | |
| | | ३,३०,६१९—२—० | |
| वजा घसारा | | १,०५०—०—० | ३,२९,५६९—२—० |
| **९ फर्निचर व फिक्चर्स** ( खरेदी किंमत ) मागील ताळेबंदाप्रमाणें | | २८,५४१—१२—४ | |
| अधिक चालू वर्षी घेतलेलें | | ३०,२८५—७—३ | |
| | | ५८,८२७—३—७ | |
| वजा चालू वर्षातील विक्री | | १५३—८—० | |
| | | ५८,६७३—११—७ | |
| वजा ३१–१२–१९५२ पर्यंतचा घसारा | ४,८४१–१२–४ | | |
| चालू सालचा घसारा | ७२०—८–३ | ५,५६२—४—७ | ५३,१११—७—० |
| **सेफ डिपॉझिट व्हॉल्ट** | | ३६,९९७—२—० | |
| वजा घसारा | | १९७—२—० | ३६,८००—०—० |
| **१० इतर ॲसेटस** ( चांदीधरून ) | | | |
| किरकोळ ॲसेटस् व बिल्डिंग ॲडव्हान्स | | ९,०९५—०—० | |
| सरकारी कर्जरोख्यांवरील येणारें व्याज | | १९,६३८—४—० | |
| व्याज घेतांना कापलेला प्राप्ती कर | | १७,३४९–१०—० | |
| प्रिंटिंग स्टॉक ( खरेदी किंमत ) | | २४,९१०–१५—० | |
| लायब्ररी ( खरेदी किंमत ) व स्टॅम्प्स इन् स्टॉक | | ७१५—८—३ | |
| बँक इन् लिक्विडेशन ( तरतूद न केलेले ) | | १७,४६०—९—० | ८९,१६९—१४—३ |
| **११ येण्यापोटीं मिळालेली नॉन-बँकिंग स्वरुपाची जिंदगी** | | | नाहीं |
| एकूण | | | ६२,५१,३८५—२—४ |

# दि भारत इंडस्ट्रियल बँक, लिमिटेड, पुणें.

## ताळेबंदांतील जिंदगीचे बाजूस पृ. १२१ वर दाखविलेल्या ॲडव्हान्सेसचा तपशील

| | रु. आ. पै |
|---|---|
| (१) पूर्ण तारणावरील कर्जे | १६,३९,१४०—१२—११ |
| (२) कर्जदाराच्या स्वतःच्या वैयक्तिक जबाबदारीवर दिलेली (सुरक्षित) | २,२५,०१४—१४—९ |
| (३) दोन अगर अधिक इसमांच्या जबाबदारीवर दिलेली (सुरक्षित) | ७,४७,८०८—१०—४ |
| (४) संशयित अगर बुडीत कर्जे (तरतूद न केलेली) | नाहीं |
| | २६,११,९६४—६—० |
| (५) बँकेचे डायरेक्टर किंवा इतर अधिकारी यांजकडून वैयक्तिकरित्या किंवा ते व दुसरे कोणी इसम यांचेकडून संयुक्त जबाबदारीवर येणें असलेली कर्जे | १,५७,८७३—५—० |
| (६) ज्यांत बँकेचे डायरेक्टरांचा डायरेक्टर, भागीदार, मॅनेजिंग एजंटस् किंवा (खाजगी कंपन्यांचे बाबतींत) मेंबर म्हणून हितसंबंध आहे अशा कंपन्या अगर फर्मसकडून येणें असलेलीं कर्जे | १,५८,४४४—१०—८ |
| (७) डायरेक्टर्स, मॅनेजर अगर बँकेचे इतर अधिकारी यांचेकडून सदर (५) खालीं एका वेळीं येणें असलेली या वर्षांतील जास्तीत जास्त रक्कम (टेंपररी ॲडव्हॉन्स धरून) | १,७१,८३९—१२—६ |
| (८) वरील सदर (६) खालीं, ज्या कंपनींत अगर फर्ममध्यें डायरेक्टरांचा डायरेक्टर, भागीदार, मॅनेजिंग एजंटस् अगर (खाजगी कंपन्यांचे बाबतींत) मेंबर म्हणून हितसंबंध आहे अशा कंपन्या अगर फर्मस यांचेकडून एका वेळीं येणें असलेली या वर्षांतील जास्तींत जास्त रक्कम | १,५८,४४४—१०—८ |
| (९) बँकांकडून येणें असलेलीं कर्जे | नाहीं |

## दि. ३१ डिसेंबर, १९५३ अखेर संपणाऱ्या वर्षाचें नफातोटा पत्रक

| खर्च | रु. आ. पै | जमा | रु. आ. पै |
|---|---|---|---|
| | | (संशयित व बुडीत कर्जांसाठीं आणि नित्याच्या व इतर आवश्यक कारणासाठीं चालू सालीं केलेली तरतूद वजा करून) | |
| १ ठेवींवर व बँकांकडून घेतलेल्या रकमांवर दिलेलें व्याज | १,२९,३५१—४—० | १ व्याज आणि डिस्कौन्ट | २,५४,७३६—९—७ |
| २ पगार, भत्ते, प्रॉव्हिडंट फंड वगैरे (यांत मॅनेजिंग डायरेक्टर्स यांना दिलेला रु. १४,६५५—०—० चा समावेश आहे.) | ९०,५१९—११—० | २ कमिशन, हुंडणावळ व ब्रोकरेज | १३,२७८—०—३ |
| ३ डायरेक्टरांची व स्थानिक सल्लागार समित्यांच्या सभासदांची फी व भत्ते | १,९३५—०—० | ३ इमारतींचें भाडें | १,०२६—१३—६ |
| ४ ऑफिस भाडें, कर, विमे, दिवाबत्ती वगैरे | ६,६०३—३—० | ४ चांदी, सोनें, जमीन व इन्व्हेस्टमेंटच्या अगर इतर जिंदगीच्या विक्रीवर मिळालेला नक्त नफा (रिझर्व्ह फंड अगर इतर कोणत्याही खातीं जमा न केलेला) | नाहीं |
| ५ लॉ चार्जेस | १५०—०—० | | |
| ६ टपाल, तार, टेलिफोन्स व स्टॅम्प्स | ५,०७६—३—३ | | |
| ७ ऑडिट फी | ७००—०—० | ५ चांदी, सोनें, जमीन अगर इतर जिन्दगीच्या पुनर्मूल्यनांत मिळालेला नक्त नफा (रिझर्व्ह फंड अगर इतर कोणत्याही खातीं जमा न केलेला) | नाहीं |
| ८ घसारा व कंपनीच्या मिळकतीस लागलेला दुरुस्ती खर्च | १,९८०—६—९ | | |
| ९ स्टेशनरी, छपाई, जाहिरात वगैरे | ९,३२२—२—६ | | |
| १० नॉन-बँकिंग स्वरूपाच्या जिंदगीच्या विक्रींत अगर व्यवहारांत आलेला तोटा | नाहीं | ६ नॉन-बँकिंग स्वरूपाच्या जिन्दगीपासून अगर अशा जिन्दगीच्या व्यवहारांत मिळालेला नफा | नाहीं |
| ११ इतर खर्च | ७,२३२—१५—२ | ७ इतर जमा— | ७,३१२—१२—५ |
| १२ निव्वळ नफा (ज्यावर प्राप्ती कर द्यावयाचा आहे असा) | २३,४८३—६—१ | | |
| एकूण | २,७६,३५४—३—९ | एकूण | २,७६,३५४—३—९ |

एम्. के. तेरणीकर, अकौंटंट.

एन्. एन्. क्षीरसागर, आर. बी. साळवेकर, मॅनेजिंग डायरेक्टर्स.

बी. बी. वाळवेकर, चेअरमन.
के. पी. जोशी, व्हाईस चेअरमन.
सौ. इंदुमतीबाई आर. फडके,
बी. पी. केळकर,
के. एम्. महाजन,
आर. पी. दामोदरे,
रा. म. गिरमे, डायरेक्टर्स.

### ऑडिटरचा रिपोर्ट

दि. ३१ डिसेंबर १९५३ अखेरचा दि भारत इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें, चा ज्यांत शाखांकडून आलेले अधिकृत रिपोर्टस् अंतर्भुत करण्यांत आले आहेत, असा सोबतचा ताळेबंद व सदर दिनांकास संपणाऱ्या वर्षाचें नफातोटापत्रक आम्ही तपासलें आहे आणि त्यावरून आम्ही दाखला देतो कीं,

(१) आम्हांला लागणारी सर्व माहिती व खुलासे आम्हांस मिळाले आहेत. (२) आमचें मतें वरील ताळेबंद व नफातोटापत्रक कायद्यास धरून तयार केलेलीं आहेत. (३) आमचे माहितीप्रमाणें व आम्हांस मिळालेल्या खुलाशाप्रमाणें आणि बँकेच्या बुकाप्रमाणें सदरहू ताळेबंद बँकेची खरी व वास्तविक स्थिति दर्शवित आहे. आणि (४) आमचें मतें हिशेबाचीं बुकें कंपनी कायद्याच्या कलम १३० प्रमाणें ठेवलेलीं आहेत. (५) आम्हांस लागणारी माहिती व खुलासे समाधानकारक आहेत. (६) आमचे निदर्शनास आलेले बँकेचे सर्व व्यवहार बँकेचे अधिकार क्षेत्रांतील आहेत. (७) शाखांच्या अधिकाऱ्यांकडून आलेले तक्ते ऑडिटरला आवश्यक ती माहिती प्रगट करणारे आहेत. (८) वरील नफातोटापत्रक हें आमचें मतें त्या वर्षाचा खरा नफा दर्शविणारें आहे.

पुणें, ता. १२—२—१९५४

खरे आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंट्स

## सहकार-पोवाडा

( शाहीर : म. द. खाडिलकर, जमखंडी )

बळी तोच कान पिळी झाला । नियम जगताला । मोडुनी त्याला । ज्यानं दिला हात दीन दुबळ्यास । वैभवाचा उभा केला विश्वास । ऐका सहकार–चमत्कारास ॥ ध्रु० ॥

### ( चौक १ ला )

नवी नवी आणली यंत्रानं । सुखसाधनं । जीव हर्षानं । फुले पाहून नित्य हो ज्यास । वश ती परी फक्त धनिकास । बळ भोगाया नसे इतरास ॥ अन्न वस्त्र निवारा तीन । गरजाही पूर्ण भागाया कठीण । भासती पैशावीण सकळास । धनिकवर्गाचे होउनी दास । दीनपण आले सकळजीवास ॥ बहुरत्ना जरी भूमाता । द्रव्यनिर्माता । जगाचा त्राता । शेतकरी, कारागीर झाला । दास्य धनिकांचे परी त्याला । करावे लागे जगायाला ॥ ग्राहकांच्या वाट्याला तसे । दास्य येतसे । मोजुनी पैसे । माल नच शुद्ध मिळे त्याला । महागाई आणी जिकीरीला । लहरी धनिकांचा चाले चाळा ॥ चाल ॥ नफेबाजी वाढे जोरानं । सेवाभाव गेला लोपून ॥ निर्माता भोक्ताही दीन । दलालांची वाढली चैन ॥ पैशाला मानाचे पान । विषमता आणी दारुण ॥ चाल ॥ जनतेच्या गळयाला फास असा बसलेला । कोण सोडवील हो त्याला ? । जनताच सोडवील त्याला । पण विश्वास कुठे मनाला ? । पिंजऱ्यातल्या दांडीवरच्या पोपटाला । दांडी फिरतांच लागते भीति वाटायला । पण पाय सोडले तर पडेल काय तो बोला ? ।। पण नाहीं विश्वास त्याला । थेट तसा प्रकार इथे झाला । जनतेचा आत्मविश्वास जागा करण्याला ॥ महामंत्र एक सहकार सिद्ध हो झाला ॥ आदेश त्याचा पहिला । सोडा स्वार्थी लाभदृष्टीला । दृढ धरा सेवाभावाला । ऐक्यानें वाढवा बळा । एका साठीं सर्व तसे सर्वांसाठी एकला । असे परस्परास्तव वेचु देत शक्तीला ॥ पैसा बुद्धी निष्ठा दक्षता जोडा कार्याला ॥ ही जागत्या गुणांची ज्योत पत सर्वांला ॥ अमर्याद तिचें सामर्थ्य नेई विभवाला ॥ ऐहिक हित साधण्याला । धंदा–राहणी–साधन–मान तसें वाढायला ॥ पिळणूकरहीत सहकार–मार्ग चांगला ॥ अभयदान दे सकलाला । हितकारी अधन सधनाला । लोकतंत्र जागृत राखी सदा जनतेला ॥ जीवनाच्या सर्व क्षेत्रांत स्थान द्या त्याला ॥ अग्रस्थान मानवतेला । पैशाचा मोह तो टाळा । सहयोग आणील सारी सुखं चरणाला ॥ असा योग कुणी आचरिला ? । सुख झालें वश कोणाला । ते सारं आता सांगीन पुढच्या चौकाला ॥ १ ॥

### ( चौक २ रा )

विणकरी अठावीस जण । दरिद्री पूर्ण । एक होऊन । ग्राहक संघ उभा करिती । 'रॉकडेल' गाव पुनीत करिती । जाहली आज जगीं कीर्ती ॥ एक एक पौंड घालून । पैसा जमवून । घाऊक दरानं । गरजेच्या वस्तु विकत घेती । किरकोळ दर स्वतः देती । संघाची वाढे अशी प्राप्ती ॥ वाढलेल्या फायद्यांतून । दमादमानं । कार्य वाढवून । ठोक विक्रीचा संघ करती । वस्तुही पुढें तयार करती । जीवना येई अशी भरती ॥ लाभदृष्टी अशी सोडून । गरजा भागवून । सुखी जीवन । करूनी आदर्श नवा देती । हाल ग्राहकांचे दूर जाती ।। निष्ठापण हवी त्यांची पुरती ॥ चाल ॥ आदर्श असा अनुसरून । इंग्लंड जाहले धन्य ॥ जर्मनीनं शेतकऱ्यांतून । आणि कारागीरामधून ॥ पतपेढ्या बँका काढून । दूर केली त्यांची अडचण ॥ मजुरांचे संघ स्थापून । उद्धार केला इटलीनं ॥ सहकारी डेअरी चालवून । डेन्मार्क झाले सधन ॥ सहकारी शेती साधून । आणि तसे सहजीवन ॥ यहुद्यानी पत्करिले पूर्ण । पुण्यक्षेत्रीं पॅलेस्टाईन ॥ चाल ॥ कितिकानी वीजपुरवठा सहकारी केला ॥ डॉक्टरी सहाय्य वश झालं सहकाराला ॥ कुणी वश केलं विमेला । घरं मिळती कुणा राहण्याला । कारखाने किती सहकारी आले जन्माला ॥ विविध उद्देशांच्या संघाला । कोण देती चालना त्याला । जे असाध्य सहकाराला । दुनियेत काय ते बोला ? । अमेरिका युरोपखंडांत मार्ग हा रुळला ॥ निराशेच्या जागीं आशेला । अंधाराच्या जागीं उजेडला । हा मार्ग देत चालला । दुबळ्याना सबळ करण्याला । अधनासि सधन करण्याला । संजीवनी मंत्र हा भला । कसा मानवेल भारताला । ते सारं आता सांगीन पुढच्या चौकाला ॥ २ ॥

### ( चौक ३ रा )

सहनाववतुसहनाभुनक्तु । तेजस्विन् अस्तु । निरामय संतु । मंत्र किति वर्षांपूर्वी घुमले । गणति काळाची कुणा न कळे । भारता तेच वंद्य झाले ॥ सहजीवन सहकार्याचा । स्वावलंबनाचा । यत्ननिष्ठेचा । धडा किति संत सुजन देती । गावगाड्याची पहा रीती । प्रत्यया आणी याची प्रचीती ॥ 'गांव करी ते न करी राव'। म्हणीचा भाव । दावी प्रभाव । जनतेच्या दृढ सहकार्याचा । भारतीय ग्राम जीवनाचा । नाडणूक रहित आचाराचा ॥ परी इंग्रज हुकुमतीखाली । घडी विघडली । अवकळा आली । व्यक्तिनिष्ठेनं समाजाला । स्वार्थ साधनेचा ध्यास सकला । समाजविन्मुख जो तो जाहला ॥ चाल ॥ घडी थाया पुन्हा बसवून । सहकार्य आलं धावून ॥ पततेढ्यांचं रूप घेऊन । अवतरे खेड्यामधून ॥ झाली पन्नास वर्षं जाण । त्याचं शेतकऱ्याला ज्ञान ॥ शेतीच्या गरजमानानं । देई पैसा थोड्या व्याजानं ॥ सावकाराच्या भारी व्याजांतून । शेतकरी सुटला हो पूर्ण ॥ चाल ॥ सहकारी बँका मोठमोठ्या आल्या उदयाला ॥ शेती मालाला दर चांगला । मिळवून द्याया मार्केटिंग सोसायट्या आल्या ॥ शेतकऱ्यांच्या पूर्ण विकासाला । विविध उद्देशांचें किती संघ येति उदयाला ॥ शहरांतल्या कारागीराला । नागरी बँका कर्ज पुरवायला तय्यार झाल्या ॥ विणकऱ्यांच्या धंद्याला तसे ग्रामोद्योगाला ॥ उत्तेजन द्याया औद्योगिक बँकाही आल्या ॥ शेतकऱ्यांना लांब मुदतीची कर्जं द्यायला । जमीन गहाण बँकाही आल्या । लढाईच्या वेळी ग्राहकांना माल पुरवायाला । ग्राहक सोसायट्या झाल्या । अशा किती सांगु प्रकाराला । सहकारी कार्याचा व्याप असा वाढला ॥ सहकारी लोकराज्याच्या करूं स्थापनेला । भारतानं निर्धार केला । सरकार सज्जही सर्व मदत देण्याला ॥ नवे नवे कायदे अनुकूल होती रोज त्याला ॥ घ्या ज्ञान तयाचे टाकून आळस चला ॥ संधीचा फायदा योग्य कार्यी घेण्याला ॥ पर्वणी आली यावेळा । स्वेच्छेचा समतेचा मार्ग सहकारी झाला ॥ सचोटीनं त्याग सेवेच्या घ्यावं दीक्षेला ॥ सहकारी संघ पाहिजे शुद्ध राखला ॥ दक्षतेनं पाहिजे कारभार सारा पाहिला ॥ ज्ञानतीच्या माणसाना वाव पाहिजे दिला ॥ नाहीं तर संधि साधू जन करिती घाताला ॥ कार्यनाश होईल पुरा । मग कराल पश्चात्तापाला । काळीमा भरतखंडाला । नका आणू विनति तुम्हाला । स्वावलंबी होवो सहकारी भारत आपुला ॥ जागृति सुखी राखुं दे देव सर्वांला ॥ ही एक विनंति असें ईशचरणाला ॥ ३ ॥

## औद्योगिक प्रगतीसाठी उपकारक सरकारी धोरण

**( श्री. आर. जी. सरय्या )**

औद्योगिक उत्पादनाची प्रगति जरी समाधानकारक असली तरी देशाची गरज लक्षांत घेतां, धंद्याची जितक्या प्रमाणांत वाढ व्हावयास पाहिजे त्या मानानें उद्योगधंद्यांत भांडवलाची गुंतवणूक होत नाहीं. उद्योगधंद्यांच्या वाढीला भांडवलाची आवश्यकता आहे. अशा वेळीं भांडवल धंद्याकडे आकर्षिलें जात नाहीं; एवढेंच नव्हे तर, नवनवीन उत्पादनाच्या क्षेत्रांतहि तें गुंतवलें जात नाहीं.

हिंदुस्थानांत वेळोवेळीं येणारे बेकारीचें हें अरिष्ट नसून अविकसित राष्ट्रांचें हें एक लक्षणच आहे. यांतून मार्ग काढण्याकरितां देशाची शेती व उद्योगधंदे यांत मोठ्या प्रमाणांत प्रगति करून देशांतील हें मनुष्यबळ सर्वत्र कामधंदा उपलब्ध करून उपयोगांत आणलें गेलें पाहिजे. मोठ्या प्रमाणावरील आधुनिक उपयोगामुळें फक्त त्यांत काम करणाऱ्यांनाच रोजगार मिळतो असें नसून, त्याबरोबरच त्या धंद्यावर अवलंबून असणाऱ्या अनेक अनुषंगिक धंद्यांतूनहि लोकांना कामधंदा उपलब्ध होतो, याकडे दुर्लक्ष करतां येणार नाहीं. कांहीं विशिष्ट धंद्यांना (लहान प्रमाणावरील धंद्यांना) साहाय्य देऊन त्यांची जोपासना करणें आवश्यक असलें तरी लहान धंद्यांच्या संरक्षणाच्या नांवाखालीं मोठ्या उद्योगधंद्यांच्या प्रगतींत व्यत्यय आणण्यांत येऊं नये. उद्योगधंद्याच्या प्रगतीचा वेग वाढविण्यांत बेकारीचा प्रश्न सुटणार आहे, उत्पादनाच्या अविकसित साधनसामुग्रीचें जतन करण्यांत नाहीं.

सरकारनें धंद्यावरील मिळणारा 'योग्य मोबदला' (फेअर रिटर्न) यावरील आपलें निदान बदलावें. 'योग्य मोबदला' याचा हिशोब करतांना सरकारी विचारसरणी बरोबर नाहीं. नफा अगर भांडवलावरील मोबदला म्हणजे धंद्यांत गुंतविलेल्या भांडवलावरील संचालकांचा मोबदला व भांडवलावरील फायदा नसून धंद्यांत पुन्हा गुंतविण्याकरितां तयार होणाऱ्या भांडवलाचाहि त्यांत समावेश असतो. सध्यां धंद्यांत अशा तऱ्हेनें जी भांडवलाची गुंतवणूक होते, त्याकडे सद्भावनेनें पाहिलें जात नाहीं. सिमेंट, पोलाद, आदींच्या किंमती ज्या टॅरिफ कमिशननें ठरवून दिल्या आहेत, त्यांचा उल्लेख सरकारी धोरणाच्या पुष्ट्यर्थ करतां येईल. हेंच सरकारी धोरण चालूं राहिलें तर, नवीन धंद्यांत भांडवल गुंतविण्याकरितां सर्वसाधारण माणूस आपल्या शिलकीचा उपयोग कधींतरी करील कां याबद्दल संशय वाटतो.

आज उद्योगधंद्यांवरील कराच्या ओझ्याचे दडपणामुळें धंद्यांत भांडवल गुंतविण्याला ओहोटी लागली असून, धंद्यांत चारिष्य दाखवून नफा कमविला तर कराचा मोठा लचका तोडून द्यावयास तयारी लागते व तोटा झाला तर दुर्दैवावर हवाला द्यावा लागतो, अशी उद्योगधंद्यांची दुःस्थिति आहे.

देशांतील वस्तू खरेदी करतांना परकीय वस्तूंपेक्षा किंमतींत देशी वस्तू २५ टक्के महाग असल्या तरी त्या प्रथम खरेदिल्या पाहिजेत. अमेरिकेसारख्या अव्वल दर्जाच्या औद्योगिक आघाडीवरील राष्ट्राला जर "बॉय् अमेरिकन ॲक्ट' सारखे कायदे करावे लागले, तर भारतासारख्या राष्ट्रानें आपल्या औद्योगीकरणाच्या प्राथमिक अवस्थेंत स्वदेशी वस्तूंचा वापर करतांना सरकारी धोरण तसें असलें पाहिजे अशी अपेक्षा केल्यास तें वावगें होणार नाहीं.

( फेडरेशनच्या नवी दिल्ली येथील अधिवेशनांत अध्यक्षीय भाषण )

## सहकार-ध्वज-गीत

( चाल : 'अखिल हिंदु विजय ध्वज हा' सारखी )

रम्य रंग भरी जीवनीं हा । ध्वजचि एकला । जगतीं ॥ ध्रु० ॥

सप्तरंग सारे दिसती । सर्व मिळुनि शोभा देती । इंद्रधनुष्याची कांती । गमत मंगला । जगतीं ॥ १ ॥

स्वतंत्रता समता पाया । स्नेह-बंध स्वेच्छेचा या । बांधी सौख्य सकला द्याया । विभव निर्मला । जगतीं ॥ २ ॥

मार्ग थोर सहकाराचा । भेदरहित मानवतेचा । विजय गात उंच तयाचा । गगनिं फडकला । जगतीं ॥ ३ ॥

फडकुं दे निरंतर ऐसा । ध्येयदीप उजळो तैसा । तेजपूर्ण नाशो तमसा । वंदु याजला । जगतीं ॥ ४ ॥

— म. द. खाडिलकर,
गणपतीगल्ली, जमखंडी.

## सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्गाच्या परीक्षेचा निकाल

द सातारा जिल्हा को-ऑ. बोर्ड लि. सांगली, या संस्थेच्या विद्यमानें विटे येथील ( खानापूर तालुका ) ता. २४-१२-५३ ते २४-२-५४ अखेर मुदतीच्या भरविणेंत आलेल्या सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्गाचा निकाल जाहीर करणेंत येत आहे. परीक्षेस एकूण २२ विद्यार्थी बसले असून त्यांपैकी १९ विद्यार्थी पास झाले असून निकालाचें प्रमाण शें. ८७% पडतें. पास झालेल्या विद्यार्थ्यांपैकीं २ पहिल्या वर्गांत, १० दुसऱ्या वर्गांत व ७ तिसऱ्या वर्गांत पास झाले आहेत.

पास झालेल्या विद्यार्थ्यांचीं नांवें गुणानुक्रमें—

(१) वर्ग पहिला—(१) सोपान केशव महाडीक, (२) रामचंद्र दादा औंधकर.

(२) वर्ग दुसरा—(१) वसंतराव कृष्णराव पाटील, (२) गुणवंत रामचंद्र पाटील, (३) गणपती दादू पवार, (४) रंगराव यशवंत शिंदे, (५) शामराव गणपती पवार, (६) राजाराम बाजीराव देशपांडे, (७) गंगाराम आण्णा पाटील, (८) शंकर कृष्णा जाधव, (९) लक्ष्मण जगन्नाथ चोथे, (१०) तुकाराम रामचंद्र मोहिते.

(३) वर्ग तिसरा—(१) भिमराव तातोबा पाटील, (२) भगवान ज्ञानदेव दोडके, (३) गणपती वामन रणभोर, (४) भिमराव नाना पाटील, (५) तुकाराम गणपती मोहिते, (६) एकनाथ ज्ञानोबा महाडीक, (७) महादेव कृष्णाजी नकाते.

### भारत सरकारचें "योजना कर्ज"

भारत सरकार दरसाल दर शेंकडा ३॥ या दराचें १९६४ मध्यें परतफेडीचें कर्ज उभारणार आहे.

येत्या १९ पासून २४ दिनांकापर्यंत दर्शनी शंभर रुपये किंमतीच्या प्रत्येक कर्जरोख्याची किंमत ९८॥ रु. राहील. पुढें दर आठवड्यांत ९ पैनीं ही किंमत वाढेल.

दर सहा महिन्यांनीं म्हणजे १९ ऑक्टोबर व १९ एप्रिलला या कर्जाचें व्याज दिलें जाईल.

"नवभारताच्या उभारणीसाठी हातभार लावण्याचें हें सर्व जनतेला आवाहन आहे," असें पं. नेहरूंनीं नव्या कर्ज-योजनेस अनुलक्षून म्हटलें आहे.

### जपानचा नवा प्रतिस्पर्धी

कल्चर्ड मोती म्हटलें कीं, एकाच देशाचें नांव प्रामुख्यानें लक्षांत येतें आणि तें म्हणजे जपानचें. पण हा व्यवसाय १९२३ सालापासून ऑस्ट्रियांतहि करण्यांत येत असे. त्या सालीं ऑस्ट्रिआंतील एका शाळामास्तरानें जपानच्या ह्या यशस्वी धंद्याची कीर्ती ऐकली आणि त्यानें एका जर्मन प्राणि–शास्त्रज्ञाच्या मद्तीनें कल्चर्ड मोत्यांचा पहिला युरोपीय कारखाना काढला. ऑस्ट्रिया–हंगेरीच्या सरहद्दीवर डॅन्यूब नदी ज्या ठिकाणीं बोहेमिआच्या पर्वतांतून बाहेर पडते तेथें ह्या दोघांनीं आपली प्रयोगशाळा उभारली. १९३५ सालापर्यंत दरवर्षी २०० मोत्यांच्या शिंपल्यावर त्यांनीं प्रयोग केले. प्रयोगामुळें २०० शिंपल्यापासून ५०,००० शिंपले तयार झाले. त्यांपैकीं ८० शिंपल्यापासून उत्तम प्रतीचें मोती मिळाले. पण गेल्या महायुद्धांत प्रयोगावस्थेंत असलेल्या ह्या कारखान्याची अतिशय हानि होऊन ५०,००० शिंपल्यापैकीं अवघे २,५०० च काय ते शिल्लक उरले. आतां कारखान्याचें पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न पुन्हां चालू झाले आहेत. १९४९ सालीं प्रो. हॅन्स ग्रॉस ह्यांनीं ह्या प्रयत्नांना सुरुवात केली. कल्चर्ड मोत्यांचा युरोपमधील हा एकमेव कारखाना होईल. समुद्रांत सांपडणाऱ्या शिंपल्यांत तयार झालेले कृत्रिम मोती आणि नदीच्या पाण्यांतील शिंपल्यांतील मोती ह्यांच्यांत फरक आढळून येत नाहीं असें समजतें. मोत्यांच्या खऱ्या शिंपल्यांत कांहीं तरी चेतनद्रव्य घालण्यापेक्षां जपानी धंदेवाल्यांनी सुरू केलेली 'इनॉक्युलेशन' ची पद्धतच अधिक यशस्वी झालेली आहे, असें तज्ज्ञ सांगतात. येत्या कांहीं वर्षांत जर्मनींत व ऑस्ट्रियांत तयार करण्यांत आलेले कृत्रिम मोती जपानी मोत्यांशीं स्पर्धा करूं लागतील, असें दिसतें.

### प्लॅस्टिकच्या ग्रामोफोन रेकॉर्ड्‌स्

भारतांत गेल्या कांहीं वर्षांत प्लॅस्टिकच्या वस्तू तयार करणारे कारखाने निघाले आहेत. ह्या कारखान्यांतून तयार होणाऱ्या वस्तूंत एका नव्या वस्तूची भर पडेल असें दिसतें. ग्रामोफोनच्या ध्वनिमुद्रित तबकड्या करण्यासाठीं आतांपर्यंत लाखेचा वापर करण्यांत येत असे व आहे. परंतु प्लॅस्टिकच्या ग्रामोफोन तबकड्या तयार करण्याचा प्रयोग अलीकडे करण्यांत येऊं लागला आहे. भारतामधील एका कंपनीनें 'पॉलिस्टेरिन' ह्या प्लॅस्टिकच्या कांपौंडचा उपयोग करून ग्रामोफोनच्या तबकड्या करण्यांत यश मिळविलें आहे असें समजतें. ह्या पद्धतीच्या तबकड्या ऑस्ट्रेलियांत आणि अमेरिकेंतही तयार करण्यांत येतात. हा नवा शोध फारच क्रांतिकारक स्वरूपाचा आहे. लाखेच्या तबकड्या फुटण्याचा धोका असतो. त्याचप्रमाणें त्या वाकड्यातिकड्याही होतात. तथापि नव्या शोधाचा विशेष असा आहे कीं, ध्वनीचें मुद्रण करण्याच्या कामीं प्लॅस्टिकच्या तबकड्या अधिक चांगल्या ठरल्या आहेत. प्लॅस्टिकच्या तबकड्यांवर ध्वनीचे ठसे अतिशय सूक्ष्म स्वरूपांत उठवितां येतात. त्यामुळें अर्धा-अर्धा तासपर्यंत चालू शकणारे रेकॉर्डस् घेतां येतील; किंवा एकाच बाजूवर चारपर्यंत गाणींहि ध्वनिमुद्रित करता येतील. ह्या तबकड्या करण्यासाठी म्युझिक मास्टर्स लिमिटेड ह्या नांवाची कंपनी स्थापन करण्यांत आली असून प्रत्यक्ष काम दि प्लॅस्टिक अँड इंडस्ट्रिअल कॉर्पोरेशन लि. करणार आहे. म्युझिक मास्टर्स लि. ह्या कंपनीचे प्रवर्तक चित्रपटाच्या धंद्याशी संबंधित आहेत. कंपनीच्या कारखान्यांत येत्या जूनपासून प्लॅस्टिकचे रेकॉर्डस् तयार होऊं लागतील. दरवर्षी १५ लाख तबकड्या कारखाना तयार करूं शकेल असें समजतें.


## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. ३८,३८१ / ३८,३८२ | पोस्ट बॉक्स नं. ४७२ | तारेचा पत्ता : फार्मबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगांसाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल
भागीदारांतर्फे रु. ३४,०६,७५०
मुंबई सरकारतर्फे रु. १६,००,०००

| | |
|---|---|
| | रु. ६०,०६,७५० |
| गंगाजळी व फंड | रु. ५७,५४,८०० |
| ठेवी | रु. ५,९०,२५,३०० |
| खेळतें भांडवल | रु. १२,७०,२७,००० |

१६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्ले, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिक्कोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. १,९०,००० |
| ठेवी | रु. ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ९२,९३,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट १० एप्रिल, १९५३ पासून सुरू झाला.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.
ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.
एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

# कण आणि क्षण
## ( सुखी जीवनाच्या पाउलवाटा )
लेखक : श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
पृ. सं. १६८ ★ किं. अडीच रु.
गुजराती आवृत्ति तयार होत आहे
भाषांतरकार :
प्रोफेसर शशिन ओझा, भावनगर



**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई.
शेअर भांडवल व रिझर्व रु. ११,७०,३००
ठेवी .... .... .... रु. १,१९,११,७००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,९४,५००
शाखा:- दादर माहीम
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात
शाखा:- बेळगांव पुणें

स्थापना १९१८


SIR RAGHUNATH PARANJPYE PURUSHOTTAM ASHRAM POONA 4.

ता. १४-११-५३

रा. श्रीपाद काळे, मु. पुणें यांस :

साष्टांग नमस्कार. वि. वि. तुमचें "कण आणि क्षण" हें पुस्तक मी समग्र वाचलें. तें वाचून फार समाधान वाटलें, व हें पुस्तक लिहिण्याबद्दल मीं तुमचें मनापासून अभिनंदन करितों. तुम्ही साध्या व्यवहारांतल्या गोष्टींबद्दल लिहिलें असलें तरी सर्वत्र मार्मिक निरीक्षण दिसून येतें. माझ्याहि ध्यानांत त्यांतल्या पुष्कळ बाबी कित्येक वेळां आल्या असून त्याविषयीं मीं लहान मंडळींस अनेकदां सांगत असें. तेव्हां अशा सकृद्दर्शनीं क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टींचें संकलन करून तुम्ही मोठें काम केलें आहे. तुमचें पुस्तक शाळांतील मुलांमुलींनीं वाचलें व त्यांतील उपदेश ध्यानांत धरून तो आचरणांत आणण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या सुखांत महत्त्वाची भर पडेल यांत शंका नाहीं.

मानवी जीवनांत मोठमोठे प्रसंग थोडेच येत असतात. असंख्य लहान लहान प्रसंगांची बेरीज केली तर ती अपवादात्मक व क्वचित् होणाऱ्या घटनांपेक्षा निःसंशय जास्त भरेल. हा धडा मुलांच्या नेहमींच्या वाचण्यांत येणाऱ्या पुस्तकांत फारसा आढळत नाहीं.

तुमचे वडील, माझे मित्र व सहकारी प्रो. वामनराव काळे, हे कॉलेजच्या कॉमनरूममध्यें आपल्या विनोदी भाषणानें नेहमीं हास्य उत्पन्न करीत असत. त्यांच्याप्रमाणेंच तुमच्या लिखाणां-ताहि नाजूक व मार्मिक विनोद क्षणोक्षणीं दिसून येत आहे. कदाचित् तुमच्या व वामनरावांच्या विनोदप्रकारांत थोडाबहुत फरक दिसून येतो एवढेंच.

असो. पुन्हां एकदां तुमच्या पुस्तकाचें स्वागत करितों, व असेंच आपण पुढें लिहाल अशी आशा बाळगितों.

कळावें, हे विनंती.

आपला
र. पु. परांजपे

---

### चितळे सिरप्स् अँड अलाइड प्रॉडक्टस् लि., मुंबई



भारत सरकारनें कैरो येथें भरविलेल्या भारतीय मालाच्या प्रदर्शनांत वरील कंपनीनें आपल्या कारखान्यांत तयार केलेलीं सरबतें, मुरंबे इत्यादि माल ठेवला आहे. त्यासाठीं कंपनीचे कार्यवाह श्री. ए. एस्. भवाळकर हे विमानानें कैरोला नुकतेंच गेले. अलेक्झांड्रिया, बसरा इत्यादि ठिकाणीं ते जाणार असून मध्यपूर्व देशांत त्यांचा माल रवाना करण्याची खटपट करणार आहेत.

### फेडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रीज रजिस्टर

ग्रंथाची पृष्ठसंख्या १,००० चे वर आहे. ६,५०० कारखानदारांची व त्यांच्या उत्पादनाची माहिती यांत दिलेली आहे. वर्णानुक्रमें ५,००० विषय ग्रथित केलेले आहेत. वर्णनें इंग्रजी, फ्रेंच व जर्मन भाषांतून दिलेलीं आहेत. १९५४ ची आवृत्ति सुधारून वाढवून परिपूर्ण केलेली आहे. किंमत ४२ शिलिंग. लीफी अँड सन्स, लि., लंडन. ग्रंथ महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या वाचनालयांत पहावयास मिळेल.


## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.



## किर्लोस्कर
पॉवरवर चालणारे

"शरद चरक"

वसंत नं. ३ चरक
## उसाचे चरक
हंगाम नजीक आला !
—सविस्तर माहितीसाठीं आजच लिहा—
किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी, (जि. द. सातारा)


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.